

संगणक तंत्रज्ञानाच्या भरारीमुळे जगभराच्या कोट्यावधी लोकांचे आयुष्य बदलत आहे. ह्यात संगणक व माहिती तंत्रज्ञानाचा वाटा मोठा आहे. संगणकाबरोबरच मोबाइल,टेलिफोनमुळे सर्वांना माहितीचे मायाजाल उपलब्ध झाले आहे.

भारतामध्ये ह्या क्रांतीमुळे अनेक बदल घडत आहेत. सध्या सुमारे दीड कोटी व्यक्तींच्या हातात परवडणारे मोबाईल फोन आहेत व ही संख्या दरवर्षी किमान १कोटीने वाढत आहे. ह्या सर्व गोष्टींमुळे ई-जीवन पद्धती अस्तित्वात येत आहे. दुकानात न जाता खरेदी करणे व त्यासाठी लागणारे आर्थिक व्यवहार करणेही इंटरनेटमुळे सहज शक्य झाले आहे.

ह्या क्षेत्रातील संगणक सेवाक्षेत्रामध्ये भारताचे नाव अग्रेसर आहे. भारतातील संगणक क्रांतीतील बदलांची, सर्वसामान्यांना माहिती देण्यासाठी माझे मित्र श्री. दीपक शिकारपूर ह्यांनी अनेक स्तरावर कामे केली आहेत. त्यांच्या संगणकाची भरारी ह्या पुस्तकाला मला प्रस्तावना देण्याबद्दल मला आनंद होत आहे. ह्या पुस्तकामुळे मराठी भाषेतील एक समृद्ध दालन ग्रामीण, शहरी भागांतील युवकांना उपलब्ध झाले आहे. मी ह्या पुस्तकाला व श्री. दीपक शिकारपूर ह्यांच्या प्रयत्नांना सुयश चिंतितो.

**-पद्मश्री किरण कर्णिक**

अध्यक्ष - नॅसकॉम